Exh 19/D

रे.क.नं.५८/२०२६

पेठवडगाव येथील दिवाणी न्यायाधीशसो कनिष्ठ स्तर
यांचे न्यायालयात...

| | | |
|---|---|---|
| सुशांत दत्तात्रय दबडे | } | वादी |
| विरूध्द | | |
| १) मुख्याधिकारीसो<br>वडगाव नगरपरिषद वडगाव<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | } | प्रतिवादी |

Order - Filed

Sd/-
C.J.J.D.Peth Vadgaon

**<u>वादीतर्फे साक्षीदाराचे ॲफिडेव्हिट</u>**

मी वादीतर्फे साक्षीदार श्री.निलेश नंदकुमार चिंगळे वय ६६, धंदा व्यापार, रा. चिंगळे गल्ली भाजीमंडई परिसर वडगाव, जि. कोल्हापूर देवाचे शपथेवर कथन करतो की,

१. मी यातील वादी व प्रतिवादी यांना ओळखतो.

२. दावा मिळकत माझ्या माहितीची आहे. माझे दुकान दावा मिळकतीसमोरच आहे.

३. वादी हे दावा मिळकतीत भाडेकरू आहेत.

४. वादी हे दावा मिळकतीत फार पुर्वीपासुन भाडेकरू असुन दावा मिळकतीचा रितसर भाडा वादी प्रतिवादी यांना नियमित अदा करतात. तसेच दावा मिळकतीचा फाळासुध्दा वादींनी नियमितपणे प्रतिवादी नगरपालिकेमध्ये अदा करतात.

No. of Corrections on this page Nil

५. दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर व्यवसाय आहे. वादी दावा मिळकतीत कोणताही बेकायदेशीर व्यवसाय करत नाहीत. दि.४.३.२०२६ रोजी व दि.१६.४.२०२६ रोजी प्रतिवादीतर्फे काही कर्मचारी वादींना कोणतीही नोटीस न देता दावा मिळकतीजवळ येऊन दावा मिळकतीतील वादीचे शांततामय कब्जास हरकत अडथळा निर्माण करणेचा प्रयत्न केला व दावा मिळकतीतील वादीचा व्यवसाय बंद करणेचा प्रयत्न केला. तसेच दावा मिळकतीचा कब्जा वादीकडून जबरदस्तीने काढून घेणेचा प्रयत्न केला.त्या दोन्ही दिवशी आम्ही दावा मिळकतीजवळच होतो. तेव्हा प्रतिवादीने आजुबाजुचे लोकांचे मदतीने प्रतिवादीतर्फे आलेल्या इसमांना तेथुन हाकलुन काढले व दावा मिळकतीचा कब्जा दिला नाही.

६. यातील प्रतिवादींनी यापूर्वीसुध्दा सि.स.नं.५१८ या मिळकतीतील काही गाळेधारकांचे विरूध्दसुध्दा बेकायदेशीरपणे कब्जा घेणेचा प्रयत्न केला होता. परंतु त्यावेळी जिल्हा न्यायालय कोल्हापुर यांनी प्रतिवादींचे विरूध्द तुर्तातुर्त मनाई ताकीदीचा आदेश देऊन आदेश पारीत केला होता. या सर्व गोष्टी मला आमचे दुकान दावा मिळकतीसमोर असलेने माहित आहे.

७. दावा मिळकतीत वादीचा कायदेशीर व्यवसाय आहे. वादी दावा मिळकतीत कोणताही बेकायदेशीर व्यवसाय करत नाहीत. प्रतिवादी यांनीच वादींना दावा मिळकतीत व्यवसाय सुरू करणेसाठी वीज कनेक्शनला परवानगी दिली होती. दावा मिळकतीमध्ये वादीने त्यांना मिळालेल्या लायसनची प्रतसुध्दा लावलेली आहे. दावा मिळकत प्रतिवादीने अगर तर्फे इसमांनी कधीही सील केलेली नव्हती व नाही. दावा मिळकतीमध्ये आजमितीसही वादीचा मटण विक्रीचा व्यवसाय असुन दावा मिळकत वादीने स्वच्छ ठेवली आहे. वादीच्या व्यवसायाने दावा

No. of Corrections on this page

मिळकतीजवळ कोणतीही दुर्गंधी नाही व आजुबाजुचे लोकांना कोणत्याही प्रकारचे त्रास नाही. काही विघ्नसंतोषी लोकांच्या व राजकीय लोकांच्या दबावाला बळी पडून प्रतिवादी ही वादीचे विरूध्द चुकीची कारवाई करत आहेत. दावा मिळकतीतील व्यवसायावर वादीचे व कामागारांचे कुटूंब अवलंबुन आहे आणि प्रतिवादी ही कायदा हातात घेऊन बेकायदेशीरपणे वादींचा काही दोष नसताना कब्जा काढुन घेणेचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे वादींचा तुर्तातुर्त मनाई ताकीदीचा अर्ज मंजुर होणे आवश्यक आहे व तो मंजुर करावा.

उपरोक्त ॲफिडेव्हिटमधील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हिट.

कोल्हापूर

ता.

ॲफिडेव्हिट करणार यांना मी ओळखतो

ॲडव्होकेट

<u>प्रतिज्ञा</u>

मी वादीतर्फे साक्षीदार श्री.निलेश नंदकुमार चिंगळे वय ६६, धंदा व्यापार, रा.चिंगळे गल्ली भाजीमंडई परिसर वडगाव, जि.कोल्हापूर या लेखाने सत्य प्रतिज्ञा करतो की वर नमुद ॲफिडेव्हिटमधील संपुर्ण मजकुर माझे माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे म्हणुन केली प्रतिज्ञा.

ता. 25/4/21

No. of Corrections on this page Nil

SOLEMNLY affirmed before me
by N. N. Chingale
Who is identified before me
by self
Whom I personally know
This 25 day of 4 2026

BEFORE ME

RAMESH RAJARAM PATIL
Advocate & Notary
At Post - Chavare,
Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur

Notary Regi. Sr. No 367/2026

NOTARY Adv. R. R. PATIL A/p. Chavare, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur GOVT. OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL